**प्रेसनोट** दिनांक १३/०२/२०२६

## ॲन्टी करप्शन विभाग, नवी मुंबई यांची यशस्वी सापळा कारवाई

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विभाग/घटक | :— | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| २. | ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक . | :— | वाशी पोलीस ठाणे, जि.रायगड, ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक २५/२०२६ वेळ १६:०६वा, दिनांक १३/०२/२०२६ |
| ३ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | | सुदाम लोटन चव्हाण, वय ५७ वर्षे, सहाय्यक अधिक्षक, (वर्ग ३) शाखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय कार्यालय, वाशी, नवी मुंबई. |
| ४. | लाचेची मागणी रक्कम | :— | रु.१०,०००/— |
| ५ | स्विकारलेली रक्कम | :— | रु.८,०००/— त्यामध्ये रु.५००/— दराच्या १६ भारतीय चलनी नोटा. |
| ६ | थोडक्यात हकिगत | :— | तक्रारदार हे खाजगी शिक्षक (जिनियस लर्निंग सेंटर) असून त्यांचे एका विद्यार्थ्यास 'अध्ययन अक्षमता' असून त्यास फेब्रुवारी २०२६ ची एस.एस.सी. बोर्डाची परिक्षा दयायची असल्याने परिक्षेसाठी लेखनिक (रायटर) मिळण्यासाठी अर्ज देण्यात आला होता.<br>विद्यार्थ्याच्या आईने तक्रारदार यांना अधिकार पत्र देवून पुढील कामकाज करुन घेण्याची विनंती केली. त्यानुसार तक्रारदार हे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ कार्यालय, वाशी, नवी मुंबई या कार्यालयात गेले असता तेथील कर्मचारी यांनी त्यांना रु.२०० दंडाची रक्कम भरुन अर्ज करण्यास सांगितले. परंतु तक्रारदार हे दंडाची रक्कम भरण्यासाठी गेले असता लोकसेवक यांनी त्यांना बोलवून घेतले व सदर विद्यार्थ्यास एस.एस. सी. परीक्षेला लेखनिक देण्याकरीता, तसेच त्याचे परिक्षेचे विषय बदलून देण्यासाठी रु.१०,०००/— लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक १२/०२/२०२६ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयास तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दि. १३/०२/२०२६ रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ कार्यालय, वाशी, नवी मुंबई येथे शासकीय पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाच मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे रू. १०,०००/— ची मागणी करून तडजोडीअंती रू. ८,०००/—रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक शासकीय पंचासमक्ष लाचेची रक्कम रू. ८,०००/— वरील कार्यालयात स्विकारली असता सापळा पथकाने त्यांना १२:४६ वा. रंगेहात पकडले. प्रस्तुत प्रकरणात गुन्हा दाखल कार्यवाही सुरू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंध विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

मार्गदर्शन अधिकारी:—१)मा.श्री. शिवराज पाटील,पोलीस अधीक्षक ,ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे परिक्षेत्र,ठाणे
२)मा. श्री. भागवत सोनवणे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
३)मा.श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
कार्यालय प्रमुख—मा.श्री.धर्मराज सोनके, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई युनिट.

संपर्क पत्ता :—ला.प्र.वि. नवी मुंबई मध्यवर्ती सुविधा इमारत फळमार्केट, तुर्भे, से.न.१९, एपीएमसी नवी मुंबई, ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेत स्थळ :—acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई—मेल :— spacbthane@mahapolice.gov.in,
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :—acbmaharashtra.net
टोलफोन नं. :— १०६४ दुरध्वनी क्र. :—०२२—२०८१३५९८/२०८१३५९९
असीबी, नवी मुंबई कार्यालय दुरध्वनी क्र. :—२७८३३३४४/७०६६६३५६६६
हेल्पलाईन क्र. :—९९२०३५१०६४

(धर्मराज सोनके)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई